असा. क्र. १०९ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शनिवार, डिसेंबर ३१, २००५/ पौष १०, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ डिसेंबर २००५

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक अरजा. २४०५/प्र.क्र. १६/सेवा-८.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ यांच्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी याद्वारे पुढील नियम करीत आहे :—

१. (*i*) या नियमांना, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) (सुधारणा) नियम, २००५ असे म्हणता येईल.

(*ii*) हे नियम दिनांक १ जानेवारी २००६ पासून अंमलात येतील.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील परिशिष्ट तीनमध्ये, नियम ३ नंतर, पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :—

" नियम ३अ. **अर्जित रजेची गणना.**



[ **किंमत :** रुपये ७.०० ]

(अ) क्षयरोग/कर्करोग/कुष्ठरोग/पक्षघात झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या परिशिष्ट तीन मधील विद्यमान तरतुदीप्रमाणेच कमाल एक वर्षाच्या मर्यादेपर्यंत सलग पूर्ण वेतनी ' विशेष रजा ' मंजूर करण्यात आल्यावर, पुढील अर्ध्या वर्षाच्या सुरुवातीस त्यांच्या खाती जमा करावयाची अर्जित रजा अशा विशेष रजेच्या कालावधीच्या १/१० परंतु कमाल १५ दिवसांपर्यंत इतकी कमी करण्यात येईल.

(ब) अर्जित रजा जमाखाती टाकताना, रजेच्या अपूर्ण दिवसाचे रुपांतर नजीकच्या पूर्ण दिवसामध्ये करण्यात येईल.''.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नसीमा म. शेख,**
शासनाच्या उप सचिव.

प्रति,

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती)

महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर (८० प्रती)

महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई (४० प्रती),

महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर (४० प्रती),

महालेखापाल (वाणिज्य लेखापरीक्षा), मुंबई,

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (४० प्रती),

संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,

निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),

* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

* प्रबंधक, मूळ न्याय शाखा, महाराष्ट्र राज्य, उच्च न्यायालय, मुंबई,

* प्रबंधक, अपील शाखा, महाराष्ट्र राज्य, उच्च न्यायालय, मुंबई,

* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

मुख्य लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई,

मुख्य मंत्र्यांचे सचिव,

मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

राज्यपालांचे सचिव,

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व मंत्रालयीन विभाग,

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधिकाराखाली असलेल्या सर्व विभागांचे व क
प्रमुख,

विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली,

वित्त विभागातील सर्व कार्यासने, (ग्रंथपाल ५ प्रती),

निवड नस्ती-कार्यासन सेवा-८, वित्त विभाग.

* पत्राने.